लोकमत सिंधुदुर्ग, सोमवार, दि. २२ डिसेंबर २०१४



# हळबे कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर

**कसई दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी श्रमसंस्कार शिबिर २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत दोडामार्ग येथील वझरे येथे आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरात २२ रोजी दुपारी ३ वाजता पर्यटन विकास महामंडळाचे प्रकल्प अधिकारी दीपक माने यांचे 'ग्रामीण पर्यटन आणि शासनाची धोरणे', २३ रोजी दुपारी ३ वाजता प्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ डॉ. राजेंद्र केरकर यांचे 'पर्यावरण आणि ग्रामस्वच्छता', २४ रोजी डॉ. रामदास रेडकर यांचे 'महिलांचे कुपोषण-एक समस्या', २५ रोजी दोडामार्ग पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पवार यांचे 'महिला सुरक्षा विषयक कायदे', २६ रोजी दुपारी ३ वाजता नेहरू युवा केंद्र, ओरोसचे शिरीष लवांदे यांचे 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. समारोप २७ डिसेंबर रोजी होणार आहे. (वार्ताहर)